ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION RESEARCH REVIEW



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

VISION RESEARCH REVIEW Half yearly Research Journal ISSN 2250-169X
Vol. I, Issue : VI, Dec. 2013 to May 2014

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Study On Morphological Variation Of Datura Species Occurring In Beed And Latur Districts Of Marathwada Region (M.S.) India | M. G. Fawade | 1-4 |
| 2 | Synthesis And Biological Study Of Some New Bis (Substiuted Aroyl Pyrazolinyl) Methanes Part - I | P. M. Band | 5-9 |
| 3 | The Role Of Organizational Behaviour & Culture In Organizational Change | Ashish Kathale, Dr. Mahesh Abale | 10-19 |
| 4 | Use Of Fertilizers And Sustainability Of Indian Agriculture : Some Evidences | Dr. Praveen K. Jadhav | 20-25 |
| 5 | Customer Relationship Way And Means In Retail Industry Of India | Dr. Ajay Srivastava, | 26-34 |
| 6 | Measurement And Comparision Of 60 M. Dash Explosive Power Between Boys Volleyball And Basketball Players | Rodge Smita , Dr. Chandrakant Satpute | 35-39 |
| 7 | Preliminary Study Of Reducing Sugar, Albumen From Some Urine Sample | Shivraj D. Bondage | 40-43 |
| 8 | हिंन्दी और जनसंचार मे माध्यम आधुनिक परिप्रक्ष्य | डॉ. जानअहेमद के. जे. | 44-49 |
| 9 | नरेश मेहता के उपन्यासों में आधुनिकता एक विशेष संदर्भ में | प्रताप आण्णासाहेब सुर्यवंशी | 50-55 |
| 10 | सूरदास का प्रकृतिचित्रण | लक्ष्मण कदम | 56-59 |
| 11 | रोजगार निर्माण में हिंदी का योगदान | राजकुमार अर्जुन वाळवंटे | 60-62 |
| 12 | भारताच्या ग्रामीण विकासात प्राथमिक कृषी सहकारी पत संस्थांचे योगदान | डॉ. वाय. के. ठांबरे | 63-66 |
| 13 | पेशवेकाळातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास | डॉ. संजय बाबुराव वाकळे | 67-70 |
| 14 | मराठवाडयाच्या विकासातील पुर्णा प्रकल्पाचे योगदान | डॉ. अनंत शिंदे | 71-73 |
| 15 | अहिराणी बोली संशोधन एक आढावा | डॉ. शशिकांत रामदास पाटील | 74-80 |
| 16 | शिक्षणाची गंगोत्री आणणारे भगीरथ आ. जयदत्त (अण्णा) क्षीरसागर | संजय पांडूरंग जोगदंड | 81-82 |
| 17 | सामाजिक न्यायाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोन | संध्या बीडकर | 83-89 |
| 18 | दलित चळवळीची वाटचाल : एक समाजशास्त्रीय विश्लेषण | डॉ. सुरेश वाघमारे | 90-95 |

**17**

# सामाजिक न्यायाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोन

डॉ. संध्या बीडकर
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
मिल्लिया महाविद्यालय,
बीड, जि. बीड

## Research Paper - Sociology

स्वातंत्र्यापासून आपपर्यंत काही सामाजिक प्रश्नांची सोडवणूक आपण करु शकलो नाही. जगण्याचा सर्वांना अधिकार आहे. परंतु सर्वांनाच आपली व्यवस्था जगण्याचा अधिकार देते का? सामाजिक स्वास्थ्यासाठी संवेदनशील प्रश्न सोडविले पाहिजे आज आपल्यापुढे अनेक प्रश्न उभे आहेत. त्यांचे स्वरुपही आज बदलले आहे. २१ व्या शतकापुढे हे मोठे आव्हान आहे. सामाजिक न्याचा विचार करताना अन्यायाचा विचार आपोआपच करावा लागतो. संघर्ष केल्याशिवाय न्याय मिळत नाही. जात नावाची गोष्ट नष्ट झाल्याशिवाय अन्याय नष्ट होणार नाही. आपण जाती संबंधीच्या प्रश्नात अडकून पडल्याने देशाच्या कल्याणाचा विचार होत नाही. ज्या मागण्या आपण ६०-६५ वर्षापुर्वी शासनाकडे करत होतो त्याच मागण्या आजही करतो आहोत.

सामाजिक न्याय ही संकल्पना भारतासारख्या जटिल समाजव्यवस्था असणाऱ्या देशात गांभिर्याने विचारात घेणे आवश्यक आहे. सामाजिक अन्यायास सामाजिक, सांस्कृतिक मान्यता असेल तर बदलणे अवघड आहे. मात्र समाज मन बदलल्याशिवाय अन्याय दूर होणार नाही. या देशात जातीवर आधारित विषमताधिष्ठित समाजव्यवस्था अस्तित्वात आहे. म्हणून सार्वजनिक जीवनात विषमता प्रचलित आहेत. अशा समाज व्यवस्थेत गुणवत्ता ही जातींना गुणवत्तेचे सर्व फायदे मिळतात. त्यामुळे सामाजिक न्यायाचा अर्थ लावताना फार मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायाबाबत बोलताना सामाजिक परिवर्तनाची दिशा देतात. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक अन्यायाविरुद्ध लढ्याची सुरुवात १९२४ पासून केलेली दिसते. शोषितांची पिळवणूक हा मुद्दा राजकीय की सामाजिक या विषयी वाद निर्माण झाला. राजकारणी लोकांना

वाटते की, सामाजिक पिळवणूक राजकीय मुद्दा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रक्रियेत सत्तेचा विचार करतात, कारण शोषितांचे मूळ हे Power Structure मध्ये आहे. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर या गोष्टीस राजकीय अंग देतात. हे २९ सप्टेंबर २००६ रोजी खैरलांजी येथे घडलेल्या घटनेवरुनही स्पष्ट होते. कारण घटना घडल्यानंतर सुरुवातीचे २० दिवस या घटनेविषयी कोणत्याही वर्तमानपत्रांनी दोन ओळीचीही बातमी दिली नाही. बहुजन समाजाची काही वर्तमापनत्रे नसती तर खैरलांजी प्रकरण अजूनही समाजापुढे आले नसते. या प्रकरणात राजकीय नेतेच गुंतलेले असल्याची खात्रीलायक माहिती पुढे आली आहे. त्यामुळे आपणास असे म्हणावे लागेल की राजकीय व्यवस्था बदलल्याशिवाय समाजातील अन्याय सहन कराव्या लागणाऱ्यांची संख्या कमी होणार नाही. सामाजिक न्याय भीकेच्या रुपात देणे म्हणजे भिकारीच तयार करणे होय.

भारतीय लोकशाही व्यवस्थेने संविधानानुसार विषमता पोसणाऱ्या समाजातही कनिष्ठ जाती व दुर्बल घटकांना सामाजिक न्याय प्राप्त करुन घेण्यास काही प्रमाणात संधी निर्माण करुन दिली आहे. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतीय समाज व्यवस्थेत जे सामाजिक सुधारणेचे पर्व सुरु झाले त्यात जातीचे उच्चाटन करण्याचेही प्रयत्न सुरु झाले परंतु असे असले तरी या काळात सवर्ण जातींप्रमाणे कनिष्ठ अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींची प्रगती झाली नाही. त्यांच्यातील दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा व मागासलेपण घालवून त्यांचा उचित विकास साधण्यासाठी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे आदी विचारवंत व कार्यकर्त्यांनी योगदान दिले आहेत. विशेषतः दलितांच्या उद्धारासाठी अहोरात्र झटणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिन्दू धर्मग्रंथातील उच्च-निचता व भेदभावावर प्रभावीपणे हल्ला केला. भारतात आपण जातीविरहीत समाजाची भाषा करीत असलो तरी सामाजिक न्याय प्रस्थापित करताना सशक्त लोक व अशक्त लोक, गरीब, श्रीमंत, सवर्ण-दलित यांच्यातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक भेद जाणून घेणे आणि दुर्बल घटकांना, गरीबांना प्रोत्साहन देऊन सशक्त करणे आवश्यक ठरते. त्यामुळे जाती भेद नको परंतु जातीभेद समजून घेणे व प्रोत्साहन देवून समाज अन्यायमुक्त करणे आवश्यक आहे.

१९७१ मध्ये अमेरिकेचे जॉन रॉल्स यांनी "Theory of Justice" नावाने ६५० पानाचे पुस्तक लिहिले. समाजातील सर्वात दुर्बल, कमकुवत गटाला विषमतेचा फायदा होणार असेल तर ते समर्थन करतात यासाठी सर्वांना समान स्वातंत्र्य द्यावे लागेल म्हणजे त्यांच्या विवेचनात त्यांनी समानतेचा आग्रह धरला आहे किंवा फार तर आपणास असे म्हणता येईल की रॉल्स सोशल सिक्युरिटीची मागणी करतो.

"Inequalities in distribution of scare goods, are justified/only if they

serve to incrase the advantage of the least favboured groups in society" - जॉन रॉलस.

प्लेटो, ॲरिस्टॉटल या प्राचीन विचारवंतांपासून ते जॉन रॉल्स या आधुनिक विचारवंतांपर्यंत अनेक तत्ववेत्यांनी न्याय संकल्पनेचा अर्थ लावला आहे. प्राचिन भारतातही या संकल्पनेचा अर्थ लावला असून त्याची सांगड धर्म व ईश्वरीय नियमांचे पालन करणे म्हणजे न्याय असा घेतला आहे. काळाच्या ओघात त्यात परिस्थितीसापेक्ष बदल होत गेले. आधुनिक काळात न्यायाचा विचार कायदा स्वातंत्र्य व समता या गोष्टी साध्य करुन देणारे साधन म्हणून केला जातो. याचा अर्थ न्यायाची संकल्पना गतिशील आहे. तिचा संबंध परिवर्तनाशी, समतेशी, नीतीशास्त्राशी, नैतिक अधिष्ठानाशी आणि विशेष म्हणजे मानवी जीवनाच्या परिपूर्णतेशी आहे. सामाजिक न्याय सिद्धांताची मांडणी करतात पाश्चिमात्य जग आघाडीवर आहे. आधुनिक मुल्य म्हणून पाश्चिमात्यांनी ही संकल्पना स्विकारली. गरीब व दुर्बलांना जास्तीचे फायदे देऊन त्यांचा उचीत विकास घडविण्याचा हेतू समोर ठेवून समाजवादी, मार्क्सवादी, उदारमतवादी, अराजकतावादी इत्यादींनी आपापल्या पद्धतीने विचार केला आहे. महाराष्ट्र राज्य सुद्धा सामाजिक न्याय निर्मिती प्रक्रियेत अग्रेसर राहिले आहे. २६ जुलै हा छत्रपती शाहू महाराजांचा जन्मदिवस दरवर्षी 'सामाजिक न्याय दिन' म्हणून पाळण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मागासवर्गीय, अपंग, वद्ध, निराधार, स्त्रिया, बालके या दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना शासनाच्या विविध विभागांमार्फत अंमलात आल्या आहेत. 'सामाजिक न्याय निर्देशांक' अहवाल दरवर्षी २६ जुलै रोजी प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला आहे.

आर्थिक विषमता कमी करण्यासाठी अनेक योजना आखल्या आहेत. त्या कार्यान्वित करण्यासाठी अनेक वित्तीय संस्थांची स्थापना केली. देशातील बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी युवकांना उद्योग व्यवसायाकडे वळवून त्यांना स्वतःचे उद्योगधंदे सुरु करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे बळ दिल्यास ते स्वयंपूर्ण बनू शकतील त्यासाठी शासनस्तरावर या युवकांसाठी वेगवेगळ्या योजना राबवून त्यांना उद्योग धंद्याचे प्रशिक्षण देण्याचे प्रयत्न चालू आहेत. अनुसूचित जाती प्रवर्गातील सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देवून त्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला जात आहे असे असले तरी भारतामध्ये सामाजिक न्यायाचे विरोधक कोण याविषयी चर्चा करताना १९९१ साली आलेले नवीन धोरण याबाबतही विचार करावा लागेल. या नवीन धोरणामुळे नवमध्यम वर्ग New Middle Class तयार झाला. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण (खाऊजा) यामुळे ५० कोटी समान २५% लोकांच्या हातात गेला. यात बडे, मध्यम वर्ग स्वतःमध्ये जास्त गुंतत गेला.

भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका, मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्वे ही एक प्रकारे सामाजिक न्यायाचीच उदाहरणे आहेत. त्यांनी व्यक्ती व्यक्तीत कोणताही भेदभाव न करता सर्वांना

विकासाची समान संधी दिली आहे. सर्वांना कायद्यासमोर सारखे मानले आहे. त्याचबरोबर आर्थिक व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करुन सामाजिक न्याय निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. हे सामाजिक न्याय निर्मितीचे सूत्र अस्तित्वात यावे यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या रुपाने भारतीय राज्यघटनेमध्ये समाविष्ट आहे. घटनेच्या कलम १४, १५, १६ नूसार समानतेचा हक्क कलम १९ ते २३ नुसार स्वातंत्र्याचा हक्क कलम २३ नुसार पिळवणूकी विरुद्धचा अधिकार कलम १७ नूसार अस्पृश्यता पाळण्यास बंदी, कलम २५ नूसार धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार आणि या सर्व कलमांच्या जपवणूकीसाठी कलम ३२ नूसार घटनात्मक तरतुदींच्या माध्यमातून भारतीय समाजात सामाजिक न्याय निर्मितीचे प्रयत्न केले आहेत. त्याचबरोबर कलम ३३०, ३३२ आणि ३३४(अ) नूसार लोकसभा, राज्यसभा, विधानसभेमध्ये अनुसूचित जाती-जमातींसाठी काही जागा राखीव ठेवलेल्या आहेत. तसेच कलम ३३५ नुसार नोकरी, सेवा व पदे यासाठी आरक्षण व्यवस्था केली आहे. त्याचबरोबर समतेचा, शोषणविरुद्धचा हक्क, धर्म स्वातंत्र्याचा हक्क, संस्कृती व शिक्षणाचा हक्क आणि घटनात्मक उपाययोजनेचा हक्क इ. चा समावेश भारतीय राज्य घटनेत केला आहे. या सर्व गोष्टींचा उदारमतवादी लोकशाहीच्या चौकटीत विचार करता असे म्हणता येईल की, सामान्य भारतीयांसाठी सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हे राज्यघटना कर्त्यांचे प्रमुख उद्दिश्ट होते आणि त्या दृष्टीने त्यांनी सामाजिक न्यायाची मूल्य भारतीय राज्यघटनेत उतरविली आहेत.

भारतीय संविधानात पारंपारिक अन्याय वंशभेद, जातीभेद, लिंगभेद या प्रश्नांना सोडविण्यासाठी घटनात्मक व्यवस्था करण्यात आलेली आहे. सामाजिक न्यायाचा विचार करताना पिडित वर्गाला विशिष्ट सोयीसवलती देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. हे तत्व वर उल्लेख केलेल्या प्रत्येक पिडित वर्गाला लागू आहेत. मागासवर्गीयांना दिल्या गेलेल्या किंवा देत असलेल्या सर्व सोयी सुविधा काढून घेण्यात याव्यात अशी सध्या मागणी जोर धरत आहे. या सामाजिक अन्यायाला व्यवस्थेतील प्रशासकीय घटकही पाठिंबा देताना दिसून येतात. भारतातील न्याय व्यवस्थाही यास अपवाद नाही. संयुक्त राष्ट्रसंघामार्फत दक्षिण अफ्रिकेतील दर्बन या ठिकाणी सामाजिक वंशिक, जातीभेद आणि स्थलांतरीत निर्वासित या घटकासंबंधी चर्चा घडवून आणली.

सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. १९२० ते १९५६ या कालावधीत अत्यंत परश्रिमपुर्वक मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता, प्रबुद्ध भारत या वृत्तपत्रांद्वारा अस्पृश्य वर्गाचे राजकीय, धार्मिक शैक्षणिक प्रबोधन केले. भारताच्या राजकारणात अस्पृश्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करण्यात यावे. तसेच राजकीय सत्तेचा केंद्र बिंदू प्रस्थापितांच्या हातात न जाता राजकीय सत्तेत अस्पृश्य अल्पसंख्यांक दुर्बल घटकांनाही स्थान मिळावे म्हणजे सामाजिक न्याय प्रस्थापित होईल. मागासवर्गीयांमधील दारिद्र्य आजही संपलेले नाही. मागासवर्गीयांकडे राहरण्यासाठी पक्की घरे मोठ्या प्रमाणात नाही. जवळ जवळ अर्ध्या मागासवर्गीयांकडे जमीनीची

मालकी नाही अशी सामाजिक स्थिती असेल तर सामाजिक न्याय कसा प्रस्तुत होईल?

भारतात आज प्रत्येक राज्याने सर्वसमावेशक विकासाची संकल्पना स्विकारली असून विशेषतः मागास जातींचा विकास, दारिद्र्य निर्मूलन, महिलांचा विकास, शेतमजूर, कामगारांचा विकास साधण्यासाठी विविध योजना कार्यान्वित केल्या. तसेच केंन्द्र सरकारनेही लोककल्याणाच्या विविध योजना आखल्या आहेत. त्यांच्या माध्यमातून दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे, त्यांना रोजगार उपलब्ध करुन देणे, व्यवसाय निर्मिती व वृद्धीसाठी मार्गदर्शन करणे, त्यांचा शैक्षणिक विकास साधण्यास मदत करणे ठतयादी उद्दिष्ट्ये समोर ठेवून तशी प्रशासकीय, राजकीय कृती व निर्णय होणे अपेक्षित आहे. असे झाले तरच सामाजिक न्याय मिळण्याची अपेक्षा आहे. व्यापारीकरणाच्या स्पधात्मक परिस्थितीचा धोरणामुळे उदारमतवादी समाज व्यवस्था संपुष्टात आली. स्वतःच्या अधिकारासाठी स्वतःच लढावे लागेल व त्याबरोबरच स्वतःच्या लढ्यासाठी व अधिकारासाठी संघटनांना दाने देण्याची प्रवृत्ती रुजवावी लागेल याबरोबरच आपणास असेही म्हणावे लागते की, सवलती उपभोगणाऱ्या वर्गाचे एक संघटन व त्याची एक ताकद उभी करावी लागेल. सर्व मागासवर्गीय संघटनांनी सामाजिक प्रश्नांना महत्व देवून सर्वत्र त्या निमित्ताने एकत्र येवून चर्चा घडवून आणली पाहिजे तरच प्रस्थापितांना सामाजिक न्याय काय असतो हे समजावून देता येईल. १५ जुलै १९२० च्या बहिष्कृत भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, दोन माणसं सारखी सुदृढ असतील तर एकाला मलिदा नि एकाला कोंडा देणे कधीच रास्त होणार नाही पण एक रोगी व दुसरा निरोगी असेल तर निरोग्याला कोंडा न रोग्याला मलिदा हिच व्यवस्था प्रशस्त ठरेन. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायासंबंधी काय भूमिका होती हे यावरुन स्पष्ट होते. याच अनुषंगाने डॉ. आंबेडकरांनी जे सामाजिक लढे दिले. उभे केले त्याचा गाभाच मुलतः सामाजिक न्यायच आहे. उच्च वर्णियांच्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी तर अस्पृश्य वर्गाने उच्च वर्णियांशी संघर्ष केला.

आज आपण भारतीय, भारतासंदर्भात २०२० च्या महासत्ता स्वप्न पाहात आहोत. माहिती आणि तंत्रज्ञान या विषयाने स्वप्नवत गोष्टी साकार केल्या हे स्वप्न साकार होईल. तथापी माणूस हा माणून बनला पाहिजे. नरसंहारक बनू नये. यासाठीच तर सामाजिक न्याय विचारात घ्यावा लागेल. विज्ञानयुग आले, आता संगणक युग माहिती तंत्रज्ञान युग एका मागून एकेक गोष्टी विकसित झाल्या या विकासात माणूसपण विसरले जात आहे. परंतु आजचा विकास हा सामाजिक न्यायाशिवाय 'चेहऱ्यावर आलेली सूज' आहे. प्रत्यक्ष जिवनाशी लोकांच्या गरजांचा आणि आकाशांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न करणे ही शिक्षण व्यवस्थेसमोर मोठी समस्या आहे आणि त्यातून देशाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बदलांसाठी विकासासाठी उत्पादकता वाढविणे, सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मता साधणे आधुनिकीकरणाला, विकासाला आणि आपोआपच

सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला गती मिळते.

एक समर्थ आणि संपन्न देश म्हणून भारताची उभारणी करावयाची असेल तर फक्त आर्थिक प्रगती, सांस्कृतिक, कृषी इ. क्षेत्राकडे लक्ष न देता तळागाळातल्या माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त झाला किंवा स्त्रियांना आपले हक्क, अधिकार देण्याबाबत अनुकुल विचार जपायला हवे. माणूसपण नाकारलेल्यांना आरक्षण देवून आपल्या अस्तित्वाची सिद्धता इ ाल्याशिवाय सामाजिक न्याय निर्मिती करता येणार नाही. आज भारत चातु:वर्णीय अवस्था, जातीयता, धर्मव्यवस्था, विषमता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, ब्राह्मणशाही, कर्मकांड, हिंसा, पापपुण्य, कल्पना, ईश्वर, आत्मा यासारख्या संकल्पनेत अडकून पडला आहे. ल्युसिअन पाय यांनी विकासाचे प्रारुप सांगताना लोकसंख्या संदर्भात, शासकीय व सर्वसामान्य व्यवस्थेला कार्यशक्ती स्तराबाबत, राजकीय संघटनांच्या संदर्भात हे तीन निकष सांगीतले आहेत. माणूस म्हणून माणसाचा विकास वेगवेगळा असतो असे नाही. विकास या संकल्पनेमध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, भाषिक, राजकीय या सर्वांगीण विकासाचा विचार करावा लागतो.

कार्लमार्क्स यांनी शोषणरहित समाज निर्मितीचे विचार विकसित करुन आर्थिक संबंध हा समाज व्यवस्थेचा पाया आहे असे म्हटले, जाती व्यवस्थेला आर्थिक बाजू नसते. सामाजिक न्यायाच्या अनुशंगाने आणखी खोलात जावून हा वैचारिक प्रवास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या योगदानापर्यंत घेवून जावा लागतो. शेवटी शासकीय सत्ता विशिष्ट लोकांच्या हातात आहे तसेच बहुजन समाजाच्या राजकीय सहभागाबाबत दिसून येणारी कमालीची उदासिनता ही सामाजिक न्यायाच्या फलिताबाबत विचारात घ्यावी लागेल.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये अनेक नेते, श्रेष्ठजन सहभागी असले तरी त्यांना एका राजकीय पक्षाने बांधून टाकले आहे आणि भारताची लोकशाही राजकीय पक्षावर अवलंबून असते तो पक्षच जर बुरसटलेल्या विचारांचा असेल तर अशा सत्ताधारी पक्षाकडून सामाजिक न्यायाची अपेक्षा काय करणार? राजकीय नेतृत्व, बुद्धीवंत, प्रशासकीय अधिकारी इत्यादींची भूमिका सामाजिक न्यायाच्या बाजूने असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार झाले असे दिसून येईल. सत्तेवर आलेला प्रत्येक राजकीय पक्ष समाजपरिवर्तनाची भाषा बोलतो त्याला वाटते की, कायद्याने हे परिवर्तन आणता येईल. ज्या देशात दारिद्र्य, अवहेलना, रोगराई, अज्ञान इ. भोगण्याचे अमाप स्वातंत्र्य अभाव ग्रस्त समाजाला लाभलेले आहे. दलित, मागासवर्गीय, स्त्री, अस्पृश्य इ. पिडित समाजाला हा देश आपला आहे असे वाटले पाहिजे. त्यांना त्यांचे हक्क उपभोगता आले तशी अनुकूल परिस्थिती निर्माण करुन दिली तर सामाजिक न्यायाच्या दिशेने आपला देश वाटचाल करतो आहे असे समजता येईल. घोषणा, आरोळ्या अथवा जाहिरातींनी गरिबी हटत नाही डॉ. भालचंद्र फडके यांच्या 'फुले आंबेडकर शोध आणि बोध' या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर